दै. गोदातीर दि. 07/09/23

# स्थानिक गुन्हे शाखेकडून १५ लाख ३१ हजारांचा ७१ किलो गांजा जप्त; तीन आरोपींना अटक



**नांदेड-** शहराच्या कामठा बायपास येथे सापळा रचून गांजा तस्करी करणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांच्या पथकाने बुधवार, दि. ६ सप्टेंबर रोजी अटक केली. त्यांच्याकडून १५ लाख ३१ हजार रुपयांचा ७१ किलो गांजा जप्त केला. त्यांच्याविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील विमानतळ ठाण्याच्या हद्दीमध्ये कामठा (खु.) माळटेकडी गुरुव्दारा मार्गे नमस्कार चौक, नांदेडकडे काही इसम एनडीपीएस कायद्याच्या तरतुदीचा भंग करुन अंमली पदार्थ (गांजा) ची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने घेवून जात आहेत अशी माहिती स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांना मिळाली.

मिळालेली माहिती वरिष्ठांना देवुन त्यांचे आदेशाने स्थागुशाचे पोलीस अंमलदार, महिला पोलीस अंमलदार, महसूलचे राजपत्रीत अधिकारी व पोलीस राजपत्रीत अधिकारी यांना सोबत मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सापळा रचला. दुपारी एकच्या सुमारास एक काळ्या रंगाचा ऑटो क्रमांक (एमएच२६- बीडी- ४५०९) हा आला. नमूद ऑटोची पंच व राजपत्रीत अधिकारी यांचे समक्ष झडती घेतली असता त्यामध्ये गांजाचे प्लॅस्टीकमध्ये छोटे व मोठे पॉकेट असा ७१.५५० किलो ग्राम ओलसर गांजा किंमती १५ लाख ३१ हजार रुपयांचा मिळून आला. सदरचा गांजा वाहतूक करत असताना आरोपी मिर्झा मोसीन नजीर बेग (वय २२ वर्षे व्यवसाय-ऑटोचालक रा. मुजामपेठ धनेगाव नांदेड), सयद मुक्तार महमद सलीम (वय ३५ वर्ष रा. हिंगोली नाका नांदेड) व परविन बेगम सयद मुक्तार (वय ३० वर्ष रा. हिंगोली नाका नांदेड) हे मिळून आले. आरोपीतांनी सदरचा गांजा हा जोहराबी ऊर्फ बब्बा खाता अन्वर खान पठाण रा. टायरबोर्ड नांदेड हिने विक्री करण्यासाठी दिला असल्याचे सांगितले आहे. सदर गांजा जप्त करण्यात आला असून, नमूद आरोपीतांविरुद्ध पोउपनि दत्तात्रय काळे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

...शेख यांनी केली. ... अर्जुन शिंदे,